# मानवी हक्क सर्वसामान्यांसाठी दीपस्तंभ: मल्लिनाथ बिराजदार

**जळकोट, दि.१७ (प्रतिनिधी)**
**पंडित दीनदयाळ उपाध्याय महाविद्यालय, देवणी, समाजशास्त्र विभाग व जवाहर महाविद्यालय, समाजशास्त्र विभाग, अणदूरच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क व सामाजिक चळवळ या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्यामप्रसाद धनुरे हे होते. समाजशास्त्र विभाग प्रमुख तथा प्र.प्राचार्य डॉ. डी. एन. दामावले, डॉ .चंद्रशेखर पाटील , प्रा.वीरभद्रेश्वर स्वामी, प्रमुख वक्ते डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.**

याप्रसंगी प्रमुख वक्ते मल्लिनाथ बिराजदार हे विचार व्यक्त करताना म्हणाले की, द्वेष, तिरस्कार, शत्रुत्व हे मानवाचे शत्रू आहेत. त्याचा त्याग करून मित्रत्व, बंधुभाव व स्वातंत्र्य मूल्यांची स्थापना करून सुंदर जीवन जगण्यासाठी मानवी हक्क आपल्यासाठी दीपस्तंबाचे कार्य करीत आहेत. भारतीय घटनेच्या अगदी सुरुवातीलाच मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांची माहिती दिली आहे. लोकशाहीत नागरिकांच्या हक्कांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्वसामान्यांसाठी त्यांचे कार्य दीपस्तंभ सारखे आहे. तो टप्पा पार केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून व महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून जगण्यासाठी बळ दिले. समानतेचा ,स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा ,धर्म स्वातंत्र्याचा सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, घटनात्मक उपायांचा हक्क ,मतदानाचा हक्क देऊन दीपस्तंभ सारखे काम मानवी हक्काच्या माध्यमातून केलेला आहे. त्या मार्गावर आपण जाऊ या. असे विचार व्यक्त केले .अध्यक्षीय समारोप श्यामप्रसाद धनुरे यांनी केले.या कार्यक्रमास जवाहर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पंडित दीनदयाळ महाविद्यालय ,देवणी येथील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विरभद्रेश्वर स्वामी यांनी केले. आभार डॉ. कांत जाधव यांनी मानले.

लोकमत



अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित रानभाजी महोत्सवात दुर्मीळ आणि औषधी अशा रानभाज्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

Hello Osmanabad
Page No. 3    Oct 20, 2022
Powered by: erelego.com

# ॲथलेटिक्स स्पर्धेत जवाहर, मोहेकर महाविद्यालयाचे यश







पुण्य नगरी । वृत्तसेवा

**अणदूर :** उस्मानाबाद येथे झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात यश मिळवलेअसून दोन पदकांची कमाई केली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि उस्मानाबाद येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालयाच्या वतीने उस्मानाबाद येथे आयोजित ॲथलेटिक्स स्पर्धेत महाविद्यालयातील ऋचा इराप्पा मुळे (एम. कॉम. प्रथम वर्ष) हिने ८०० व १५०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले. योगिनी नागेश धुमाळ (बी.एस.सी. द्वितीय वर्ष) हिने थाळीफेकमध्ये सुवर्ण पदक, १०० मीटर व ४०० मीटर कांस्य पदक पटकावले. या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा सरपंच रामचंद्र आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, क्रीडा शिक्षक डॉ. उमाकांत सलगर, डॉ. सुर्यकांत आगलावे, प्रा. विरभद्रेश्वर स्वामी, कार्यालयीन अधीक्षक काशिनाथ करपे, संतोष चौधरी यांच्या उपस्थितीत यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

## मोहेकर महाविद्यालयास सुवर्णपदक

**कळंब:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व व्यंकटेश महाजन महाविद्यालयाच्या वतीने उस्मानाबाद येथे आयोजित ॲथलेटिक्स स्पर्धेत शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी करून यश मिळवले. महाविद्यालयातील निकिता संभाजी वायकर हिने लांबउडी व १०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक पटकावले. करडे ऐश्वर्या हिने गोळा फेक स्पर्धेत प्रथम तर लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य पदक मिळवले. संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार, उपप्राचार्य डॉ. सतीश लोमटे, प्रा.सरस्वती वायभसे, हनुमंत जाधव , अरविंद शिंदे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद यांनी यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले.

जनमत सर्वसामान्यांचे | उस्मानाबाद जिल्हा-विशेष | दिनांक २० ऑक्टोबर २०२२ | पान ६

# जवाहर महाविद्यालयात रानभाजी महोत्सव उत्साहात संपन्न



# अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना शंभर टक्के निधी वितरीत : जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे



## सततच्या पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना ७९ कोटी ८४ हजार वितरीत, उर्वरित निधी दोन दिवसात पूर्ण वितरीत करणार

### अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना ९० कोटी ७४ लाख ३६ हजार निधी वितरीत

# ईट येथील शिवा संघटना शाखेला शिवा संघटनेचा राष्ट्रीय गाव शाखा पुरस्कार जाहीर



## अवैध मद्य विरोधी कारवाई

## जाहीर नोटीस

# निर्यातक्षम फळे व भाजीपाला बागांचे ट्रेसिबीलीटीनेट अंतर्गत नोंदणी सुरु

# सुरतगाव येथे आयुष्मान भारत योजनेचे शिबीर संपन्न

### १४० लाभार्थीना मिळाला योजनेचा लाभ



## जाहीरनामा

### वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत तुळजापूर येथील मा.दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, यांचे कोर्टात

# संगणक परिचालक यांच्यावर माथेफिरूचा हल्ला, जीवे मारण्याची धमकी

### माथेफिरूवर गुन्हा दाखल करा, संगणक परिचालक संघटनेची तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



## वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत तुळजापूर येथील मा.दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, यांचे कोर्टात

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 7
05 Nov 2022

# जवाहर महाविद्यालयाच्या मुळे, धुमाळ यांची निवड



**अणदूर** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि व्यंकटेश महाजन महाविद्यालय उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित उस्मानाबाद झोनच्या इंटर कॉलेज ॲथलेटिक्स टूर्नामेंटमध्ये अणदुर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी ऋचा इराप्पा मुळे, योगिनी नागेश धुमाळ यांना गोल्ड मेडल मिळाले आहे.

ऋचा मुळे हिला ८०० मीटर व १५०० मीटर धावणे मध्ये गोल्ड मेडल मिळाले असून, योगिनी धुमाळ हिला थाळीफेक मध्ये गोल्ड मेडल व १०० मीटर व ४०० मीटर ब्राँझ मेडल मिळाले. या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा सरपंच रामचंद्र आ-लूरे, प्राचार्य डॉ.उमाकांत चन्नशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, क्रीडा शिक्षक डॉ.उमाकांत सलगर, डॉ.सूर्यकांत आगलावे, प्रा.विरभद्रेश्वर स्वामी, कार्यालयीन अधीक्षक काशिनाथ करपे, संतोष चौधरी आदींनी अभिनंदन केले.

लोकमत

# जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दिले गणित, इंग्रजी विषयाचे धडे

## अणदूरच्या जवाहर विद्यालयात आठवीच्या वर्गाला अध्यापन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर** : जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी गुरुवारी अणदूरला भेट देऊन श्री. खंडोबाचे दर्शन घेतले. यानंतर मंदिर परिसरात असलेल्या जवाहर विद्यालयास भेट देत चक्क गुरुजी बनून विद्यार्थ्यांसोबत गणित, इंग्रजी, विज्ञान, मराठी या विषयाच्या अनुषंगाने संवाद साधला.

गुरुवारी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी अणदूर गावाला अचानक भेट दिली. यावेळी खंडोबा देवस्थान ट्रस्ट व देवस्थान संघर्ष समितीच्या विषयावर गावपातळीवरच वाद, तंटे मिटवून समन्वयातून निपटारा करण्याच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा केली. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून श्री. खंडोबा मंदिर व शाळा बांधकाम, भक्तनिवास बांधण्यासाठी पाठपुरावा करण्याचे त्यांनी अश्वस्त केले. येथील बैठकीनंतर ते मंदिर परिसरात असलेल्या जवाहर विद्यालयात दाखल झाले. याठिकाणी चक्क गुरुजी बनून त्यांनी विद्यार्थ्यांना अध्यापनाचे धडे दिले. इंग्रजी, गणित, विज्ञान व मराठी या विषयावर संवाद साधत विद्यार्थी व शिक्षकांना मूलभूत प्रश्न विचारुन विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता वाढीसाठी हुशार विद्यार्थ्यांबरोबरच साधारण विद्यार्थ्यांकडे ही विशेष लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपजिल्हाधिकारी अविनाश कोरडे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, उपमुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, ग्रामविकास अधिकारी देविदास चव्हाण, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बालाजी मोकाशे, तलाठी विलास कोल्हे, माजी सरपंच धनराज मुळे, बाळकृष्ण घोडके-पाटील, अरविंद घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जवाहर विद्यालय, श्री. खंडोबा देवस्थान ट्रस्ट व जवाहर महाविद्यालयाच्या वतीने डॉ. ओम्बासे यांचा सत्कार करण्यात आला.



### रोपवाटिकेचा झाला शुभारंभ

- जवाहर महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांच्या हस्ते तुतीची लागवड करुन तुती रोपवाटिकेचा शुभारंभ करण्यात आला. यानंतर डॉ. ओम्बासे यांनी शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या समाधी स्थळी जाऊन दर्शन घेतले. जवाहर महाविद्यालयात प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, डॉ. एस. एस. बाड, डॉ. जी. टी. राठोड, डॉ. नागेश बिराजदार, डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. एम. बी. बिराजदार, काशिनाथ करपे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 2 Nov 11, 2022
Powered by: erelego.com

# बालदिनानिमित्त प्रबोधनपर नाटिका सादर




अणदूर : बालदिनानिमित्त जवाहर महाविद्यालयात हॅलो मेडिकल फाउंडेशनच्यावतीने हिंसामुक्त जीवन, आनंदी जीवन या विषयावर प्रबोधनपर नाटिका सादर करण्यात आली.

संचार वृत्तसेवा

अणदूर, दि. १४- जवाहर महाविद्यालयात सोमवारी बालदिनानिमित्त माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जवाहर महाविद्यालयात हॅलो मेडिकल फाउंडेशनतर्फे निर्धार समानतेचा या प्रकल्पांतर्गत 'हिंसामुक्त जीवन, आनंदी जीवन' ही नाटिका सादर करण्यात आली.

हॅलो मेडिकल फाउंडेशनच्यावतीने सादर बालकांसाठी सादर केलेल्या नाटिकेमधून समाजामध्ये असणारी कौटुंबिक अहिंसा, त्यामुळे नात्यांमध्ये निर्माण होणारा दुरावा व त्याचे गंभीर परिणाम आणि हे टाळण्यासाठीचे उपाय याचा संदेश देण्यात आला. समूहाने समाजप्रबोधन करण्याचा अतिशय स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. कसल्याही प्रकारचे नेपथ्य नसताना केवळ अभिनयातून ते सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांना करमणुकीमधून समाजप्रबोधन करण्यात आले. या नाटिकेचे प्रमुख अभिजित चौधरी व धनश्री हुबळीकर यांनी नेतृत्व केले.

यावेळी प्रा. डॉ. संजय कुलकर्णी, प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा, प्रा. डॉ. विश्वास माने, प्रा. डॉ. राजशेखर नळगे, प्रा. भागवत यांनीही आपले नाटिकेबद्दलचे अभिप्राय नोंदविले. सर्व कलाकारांचा उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. सूर्यकांत आगलावे व एन.एस.एस.मधील सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी बसवराज नरे उपस्थित होते.

# आलुरे गुरुजींची शाळा पाहून भारावले जिल्हाधिकारी ओंम्बासे!

## गुरुजींच्या स्मारकासही झाले नतमस्तक; शिक्षकांसह विद्यार्थी मित्रांशीही साधला संवाद

श्रीकांत अणदूरकर,
अणदूर, दि. १० नोव्हेंबर-

शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरूजींनी उभारणी केलेल्या जवाहर विद्यालय, अणदूर येथे आज (दि. १०) धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांनी भेट दिली आणि या ठिकाणची शिस्त, गुणवत्ताधारक विद्यार्थी पाहून ते भारावून गेले. या भेटीनंतर जिल्हाधिकारी गुरूजींच्या स्मारकासही नतमस्तक झाले.

प्रारंभी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रारंभी ग्रामदैवत श्री खंडोबा देवाचे दर्शन घेतले. यानंतर इ. ८ वी 'क' वर्गात प्रवेश करून विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासत असताना गणित, विज्ञान, इंग्रजी या विषयावर अनेक प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे समर्पक दिली. गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयांवर इंग्रजी व मराठीतून संवाद विद्यार्थ्यांशी केला. विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक सुरेश टोंबरे यांनी जिल्हाधिकारी तसेच उपजिल्हाधिकारी अविनाश कोरडे यांचाही सत्कार केला.

सत्काराला उत्तर देताना जिल्हाधिकारी म्हणाले, मीही रयत शिक्षण संस्थेच्या अशाच शाळेमधून शिक्षण घेतले, कर्मवीर भाऊराव पाटलांसारखेच शिक्षणमहर्षी स्व. आलुरे गुरूजींचे कार्य याठिकाणी पाहावयास मिळाले. पवित्र अशा मंदिराच्या अंगणातील हे शैक्षणिक कार्य पाहुन ते भारावून गेले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अंतर्गत शाळा भैतिक सुविधा, इमारत बांधण्यासाठीचा पाठपुरावा करण्याचे अभिवचन त्यांनी दिले. भव्य भक्त निवास, सुंदर शालेय इमारत साकारण्यासाठीचा प्रयत्न ग्रामस्थांनी करावा, असे आवाहन केले.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश टोंबरे, उपमुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, माजी सरपंच धनराज मुळे, ग्रामसेवक देविदास चव्हाण, तलाठी कोल्हे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, खंडोबा देवस्थान अध्यक्ष बालाजी मोकाशे व सर्व पदाधिकारी, ग्रा. पं. सदस्य बाळकृष्ण घोडके, नागनाथ शेटे, आण्णासाहेब आलुरे, पत्रकार दयानंद काळुंके, लक्ष्मण नरे, शिवशंकर तिरगुळे, गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार लिंबाजी सुरवसे यांनी केले.

दरम्यान, जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांनी जवाहर महाविद्यालयासही भेट दिली. यावेळी त्यांनी स्व.आलुरे गुरूजी यांच्या नियोजित स्मारकाला भेट दिली आणि ते नतमस्तक झाले. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागांची माहिती



घेतली. प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने तुती लागवड करण्याविषयी चर्चा केली. यावेळी त्यांनी बजेट देण्याचेही आश्वासन दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, डॉ. एस. एस. बाड डॉ. जी.टी. राठोड , डॉ. नागेश बिराजदार ,डॉ अनिता मुदकण्णा, भारती, काशिनाथ करपे व इतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे

**एकमत**

मुंबई येथील कंज्युमर गाईडन सोसायटी ऑफ इंडियाचा पुढाकार; दिपप्रज्वलनाने केले उद्घाटन

# जवाहर महाविद्यालयात ग्राहकांचे हक्क व वित्तीय साक्षरता कार्यशाळा



---

**लोकमत**

# लेकराएवढं प्रेम करा, मग बघा पैसा टिकतो की नाही..!

## तीर्थराज पांडे : कार्यशाळेतून वित्तीय साक्षरतेचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** पैशाचं योग्य नियोजन केलं तर आपण जीवनात यशस्वी होतो. पैशावर प्रेम करायला शिका. आपल्या लेकराएवढं प्रेम केल्यास पैसा वाढेलही अन् चालेलही, असे मत कन्झ्युमर गाइडन्स सोसायटी ऑफ इंडियाचे प्रकल्प व्यवस्थापक तीर्थराज पांडे यांनी व्यक्त केले.

अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात घेण्यात आलेल्या 'ग्राहकांचे हक्क व वित्तीय साक्षरता' या एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. मंचावर प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, नंदकुमार मेनन, डॉ. एस. जी. बिराजदार, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. धनराज कदम, डॉ. हरिदास जोगदनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




पांडे म्हणाले, आपण सर्वजण ग्राहक आहोत. ग्राहक, सेवा, सुरक्षा आणि आनंद याचे जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पैशाचे योग्य नियोजन केल्यास आपण जीवनात यशस्वी होतो. मेहनत आणि प्रामाणिकपणे कष्ट करून पैसा कमवा. पैसा चालावा, पळावा यासाठी काय करता येईल, याचा विचार केला तर आपल्या लेकरावर जसे प्रेम करतो, तसे पैशावर प्रेम करा. त्याचा सांभाळ करा आणि योग्यवेळी खर्च करा. ज्यामुळे निश्चित आपल्याकडील पैसा टिकेल अन् वाढेलही, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. जी. बिराजदार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. आभार डॉ. सुधाकर सांगळे यांनी मानले.

Hello Osmanabad
Page No. 2 Nov 21, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# पदवी अभ्यासक्रम होणार चार वर्षांचा!

## यूजीसीची योजना तयार, जुना अभ्यासक्रमही चालू राहणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाल्यानंतर पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यात आला असून त्यानंतर सर्व केंद्रीय विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांसाठी नवीन नियम केले जातील. चार वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांची (एफवाययूपी) रूपरेषा तयार आहे. येत्या शैक्षणिक सत्रापासून (२०२३-२०२४) पासून, सर्व विद्यापीठांचे नवीन विद्यार्थी ४ वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांमध्ये (बीए, बीकॉम, बीएस्सी इ.) प्रवेश घेऊ शकतील.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) ४ वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठी सर्व आवश्यक नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. यूजीसीच्या म्हणण्यानुसार, पुढील आठवड्यात, ४ वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठीचे हे नियम देशातील सर्व विद्यापीठांना सामायिक केले जातील.

२०२३-२४ पासून, जेथे सर्व नवीन विद्यार्थ्यांना चार वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांचा पर्याय असेल, ४ वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमाची योजना जुन्या विद्यार्थ्यांसाठीही मंजूर केली जाऊ शकते. याचा सरळ अर्थ असा की, ज्या विद्यार्थ्यांनी या वर्षी सामान्य तीन वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला आहे त्यांना पुढील सत्रापासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात सहभागी होण्याची संधी मिळू शकते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या म्हणण्यानुसार, सर्व विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला जाईल, परंतु या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची सक्ती विद्यार्थ्यांना केली जाणार नाही. विद्यार्थ्यांची इच्छा असल्यास, ते आधीपासून सुरू असलेले ३ वर्षांचे पदवीपूर्व अभ्यासक्रम सुरू ठेवू शकतात. यूजीसीचे अध्यक्ष प्रोफेसर एम जगदेश कुमार यांच्या मते, ४ वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांची संपूर्ण योजना लवकरच सार्वजनिक केली जाईल.

### नवीन विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांचा पर्याय

पुढील सत्रापासून देशातील सर्व ४५ केंद्रीय विद्यापीठांमध्ये ४ वर्षांचे पदवीपूर्व अभ्यासक्रम लागू केले जातील. सर्व केंद्रीय विद्यापीठांसह बहुतेक राज्यस्तरीय आणि खासगी विद्यापीठेदेखील ४ वर्षांचे पदवीपूर्व अभ्यासक्रम राबवतील. याशिवाय देशभरातील अनेक 'डीम्ड टू बी युनिव्हर्सिटीज'देखील हा ४ वर्षांचा पदवीपूर्व कार्यक्रम राबविण्यास संमती देणार आहेत.

### शिक्षक संघटनांचा आक्षेप

यूजीसी या नवीन बदलासाठी पूर्णपणे सज्ज असताना, अनेक शिक्षक आणि शिक्षक संघटनांनी यावर आपले आक्षेप नोंदवले आहेत. ४ वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांवर एक वर्षाचा आर्थिक बोजा वाढणार असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे.

Aurangabad Main
Page No. 9 Nov 23, 2022
Powered by: erelego.com



# जवाहर महाविद्यालयात शपथविधी

**अणदूर** : जवाहर महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त शपथविधी घेण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष म्हणून रामचंद्र आलूरे, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, प्रा. डॉ. सोमगोंडे, प्रा. डॉ. विश्वास माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन करताना ढोबळे म्हणाले, गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून समाजातील वंचित घटकाच्या पाठीवर थाप देण्याचे कार्य शिक्षण महर्षी आलुरे गुरूजी जीवनभर करीत राहिले. गुरूजींनी केलेले कार्य सतत प्रेरणा देत राहणार आहे. गुरूजींच्या स्मारकासमोर नतमस्तक होण्याचे भाग्य मला लाभले. गुरूजींचे विचार समाजापर्यंत पोहोचवू असेही ते म्हणाले. डॉ. सोंमगोडे यांनीही विचार व्यक्त केले. संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विश्वास माने तर प्रा. विवेकानंद वाहूले यांनी आभार मानले.

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
27 Nov 2022 - Page 8

# जवाहर महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त शपथविधी

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २६ नोव्हेंबर-**

दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी जवाहर महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त शपथविधी घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष म्हणून रामचंद्र दादा आलूरे, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेटी, उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, प्रा.डॉ. सोमगोंडे, प्रा.डॉ.विश्वास माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन करताना माजी मंत्री ढोबळे म्हणाले की, म. बुद्ध, म.बसवेश्वर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून समाजातील वंचित घटकाच्या पाठीवरती थाप देण्याचे कार्य शिक्षण महर्षी आलुरे गुरुजी जीवनभर करीत राहिले. दुरितांचे तिमिर जावो म्हणून समाजाच्या जीवनातील अंधार दूर करण्यासाठी गुरुजींनी केलेले कार्य आपल्याला सतत प्रेरणा देत राहणार आहे.



सूत्रसंचालन प्रा. डॉ. विश्वास माने यांनी व प्रा. विवेकानंद वाहूले यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



## जवाहर महाविद्यालयाला 'आदर्श महाविद्यालय' पुरस्कार

**अणदूर, दि.२८ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाला चाणक्य गुरुकुल व ड्रीम फाउंडेशन सोलापूरच्या वतीने 'आदर्श महाविद्यालय' पुरस्कार देण्यात आला. सोलापूर येथील मुळे सभागृहामध्ये सदरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशीनाथ भतगुणकी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, मिलिंदजी थोबडे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. संविधान दिन व ड्रीमच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून प्रा. डॉ. संजय कुलकर्णी, प्रा डॉ. राजशेखर नळगे, प्रा.डॉ. एन. एस. सोमगुंडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**लोकमत**

हलगी महोत्सवात दोनशेवर कलाकारांचा सहभाग

# हलग्यांच्या कडकडाटाने अणदूरनगरी दुमदुमली..!

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे रविवारी आयोजित हालगी महोत्सवानिमित्त गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी कलाकारांच्या हलगीच्या कडकडाटाने परिसर दुमदुमून गेला होता.

येथील जवाहर महाविद्यालय, संत तुकाराम सामाजिक संस्था (बाभळगाव) व जय मल्हार पत्रकार संघाच्या वतीने हा महोत्सव घेण्यात आला. यानिमित्त प्रारंभी हुतात्मा स्मारक मंदिरापासून शोभायात्रा काढण्यात आली. यादरम्यान मुख्य बाजारपेठ, आण्णा चौक, बाजार मैदान व खंडोबा मंदिर परिसरात ठिकठिकाणी हालगी कलाकारांनी हालगी कलेचे विविध देखावे सादर करून अणदूरकरांचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीने अणदूर व परिसर दणाणून गेला होता. या शोभायात्रेत चुंगी, हन्नुर, वडगाव, कोराळ, दहिटणे, शहापूर, इटकळ, अणदूर, चिकुंद्रा, चिवरी येथील हालगी पथकांनी विविध कलेचे सादरीकरण केले. हुतात्मा स्मारक मंदिर परिसरात शोभायात्रेची सांगता करण्यात आली.

यानंतर आयोजित हलगी महोत्सव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण होते. यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले, महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे सदस्य उमाकांत मिटकर, सरपंच रामचंद्र आलुरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, उपप्राचार्य डॉ. मल्लीनाथ लंगडे, जिल्हा विशाखा समीतीच्या जिल्हाध्यक्ष बाबई चव्हाण, माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना, ज्येष्ठ पत्रकार अजय अणदूरकर, संत तुकाराम सामाजिक संस्थेचे संस्थापक विवेकानंद काळुंके, माजी सरपंच अझर मुजावर, माजी सरपंच प्रबोध कांबळे, हालगी कलावंत प्रतिनिधी बाबूराव गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दोनशे कलाकारांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. एम. बी. बिराजदार, सूत्रसंचालन डॉ. संतोष पवार यांनी केले. आभार शिवशंकर तिरगुळे यांनी मानले.

## कलावंतांनी मांडल्या विविध मागण्या

- या हालगी महोत्सवात हालगी कलेला अभिजात कलेचा दर्जा मिळावा, हालगी कलेला मैदानी खेळाचा दर्जा मिळावा, हालगी कलाकारांना शासकीय मानधन सुरु व्हावे, मोफत प्रवास सवलत मिळावी, पेन्शन योजना लागू करावी, ग्रामपंचायत पातळीवर घरकूल योजना लागू करावी, आदी मागण्या हालगी कलावंतांच्या वतीने मांडण्यात आल्या. यावर उपस्थित मान्यवरांनी या मागण्यांच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.



अणदूर येथे रविवारी आयोजित हलगी महोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत सहभागी समाजबांधव.

## यशस्वीतेसाठी यांचा पुढाकार

- या महोत्सवासाठी चंद्रकांत हागलगुंडे, संजीव आलुरे, सचिन तोग्गी, विलास काळुंके, दिगंबर लोंढे, राजेंद्र गायकवाड, उमेश गायकवाड, सिकंदर शेख, डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. उमाकांत सलगरे, प्रा. सोमशंकर राजमाने, डॉ. विश्वास माने, डॉ. सत्येंद्र राऊत, प्रा. सत्यवान भोवाळ यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी, संस्था प्रतिनिधी कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला होता.

Hello Osmanabad
Page No. 4 Dec 19, 2022
Powered by: erelego.com

पुढारी

# अणदूर येथे हलगी महोत्सवाचे आयोजन

**अणदूर** : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालय,संत तुकाराम सामाजिक संस्था बाभळगाव व जय मल्हार पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क दिनाचे औचित्य साधून १७ डिसेंबर रोजी अणदूर येथील हुतात्मा स्मारक सभागृहात हलगी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्रीय लोक कलेतील हालगी लोककलेनी महाराष्ट्रातच नव्हे तर देश व देशाबाहेरही आपल्या कलेचे सादरीकरण करुन महाराष्ट्राचे मानाचे तुरे रोवले आहेत,पण ही कला उपेक्षित व दुर्लक्षित राहीली आहे,आयुष्यभर दुसऱ्याच्या सन्मानामध्ये हालगी वाजवणा-या कलावंताच्या वाटेला कधी सन्मान मिळाला नाही, त्यामुळे जवाहर महाविद्यालय,संत तुकाराम सामाजिक संस्था व जय मल्हार पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या हालगी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यासाठी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे,उमरग्याचे आमदार ज्ञानराज चौगुले, महाराष्ट्र पोलीस तक्रार प्राधिकरणचे सदस्य उमाकांत मिटकर,अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे, उपसरपंच डॉ नागनाथ कुंभार ,उपप्राचार्य डॉ मल्लीनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या महोत्सवात दिडशे हालगी कलावंताचा सन्मान होणार असुन हुतात्मा स्मारक ते श्री खंडोबा देवस्थान पर्यंत या हालगी कलावंताची रॅली निघणार आहे असे महोत्सवाचे आयोजक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी,संत तुकाराम सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दयानंद काळुंके,जय मल्हार पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय अणदूरकर यांनी कळविले आहे.

My Latur Edition
Dec 12, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

सोलापूर

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

epaper.dainiktarunbharat.com
13 Dec 2022 - Page 12

# एकमेकांचा स्वाभिमान दुखावला तरच संसारात वाद: डॉ. अनिता मुदकण्णा

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १२ डिसेंबर-**

नवरा, बायको दोघांना पण स्वाभिमान आहे, एकमेकांचा स्वाभिमान दुखावल्यावर संसारात वाद निर्माण होतात, दोघांमध्ये असणारा विश्वास, आत्मविश्वास, भावनिक बंध, समजूतदारपणा जपला तरच तो संसार यशस्वी होतो. पत्नीला मैत्रीण समजून वागल्यास संसारात वाद निर्माण होत नाहीत. त्यासाठी दोघांची मनसिकता तयार करणे हाच सुखी संसाराचा मूलमंत्र आहे, असे उद्गार जवाहर कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकण्णा यांनी काढले.



त्या अणदूर येथील हॅलो मेडिकल फाउंडेशन आयोजित 'निर्धार समानतेचा' प्रकल्प अंतर्गत नवविवाहित जोडपी स्वागत समरंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी पत्रकार रवींद्र केसकर हे होते तर व्यासपीठावर पत्रकार राजेंद्र स्वामी, पत्रकार अजय अणदूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सूत्रसंचालन सतीश कदम यांनी तर आभार वैजीनाथ लोहार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीततेसाठी बालाजी जाधव, प्रसण्णा कंदले, दिनकर गाढवे, जावेद शेख, श्रीकांत कुलकर्णी, स्वाती पाटील, ऋचा मुळे, इंदुमती कबाडे, म्हाळू गळाकाटे, नर्सिंग स्कुलच्या विद्यार्थीनींनी परिश्रम घेतले.

लोकमत

# सिनेटवर कदम, अभ्यास मंडळावर सलगरेंची वर्णी

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. अंकुश कदम हे विद्यापीठ सिनेटवर निवडून आल्याबद्दल तर शारीरिक शिक्षण विभागातून अभ्यास मंडळावर डॉ. उमाकांत सलगरे हे निवडून आले. याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांनी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. राजशेखर नळगे यांनी प्राध्यापकांच्या वतीने, डॉ. डी. एस. यांनी सूर्यवंशी वनस्पती शास्त्र विभागाच्या वतीने तर प्रा. शैलेश शाईवाले यांनी ग्रंथालय विभागाच्या वतीने या दोघांचा सत्कार केला. याप्रसंगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. राजशेखर नळगे यांनी केले. आभार सुनील रजपूत यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी हजर होते.



अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात प्रा. डॉ. अंकुश कदम व डॉ. उमाकांत सलगरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी.

Hello Osmanabad
Page No. 4 Dec 16, 2022
Powered by: erelego.com

# अणदूर येथे डॉ. कदम, डॉ. सलगर यांचा सत्कार



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील जवाहर महाविद्यालयातील प्राध्यापकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षक अधीसभा (सिनेट) निवडणुकीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील प्रा. डॉ. अंकुश कदम व शारीरिक शिक्षण विभागातून अभ्यास मंडळावर निवडून आल्याबद्दल डॉ.उमाकांत सलगर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे, अॅड. लक्ष्मीकांत पाटील, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. राजशेखर नळगे, डॉ. डी. एस. सूर्यवंशी, प्रा. शैलेश शाईवाले यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. राजशेखर नळगे तर सुनिल रजपुत यांनी आभार मानले.

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
18 Dec 2022 - Page 2

# हलगी कलाकारांना शासनदरबारी न्याय मिळवून देवू

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि. १७ डिसेंबर-**

हलगी ही कला आहे, हलगीमुळे स्फुरण चढते, एक जोश येतो परंतु हलगी कलाकार हा कायम वंचित राहिला, त्यासाठी शासन दरबारी आवाज उठवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करू, हलगी कलाकारांनी व्यसनमुक्त व्हावे, मुला बाळांना शिक्षण द्या, आयोजकांनी आयोजित या आगळ्यावेगळ्या हलगी महोत्सव आयोजित करून या कलाकारांचा सन्मान केला ही अभिनंदनिय गोष्ट आहे. असे उद्‌गार माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी काढले.

ते अणदूर येथे जवाहर महाविद्यालय, तुकाराम सामाजिक संस्था, व जय मल्हार पत्रकार संघ आयोजित हलगी महोत्सव कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलत होते. या वेळी व्यासपीठावर आमदार ज्ञानराज चौगुले, पोलीस प्राधिकरण सदस्य उमाकांत मिटकर, अणदूरचे सरपंच रामचंद्र आलूरे, जवाहर कॉलेजचे उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, संत तुकाराम सामाजिक संस्थेचे विलास काळुंके, जयमल्हार पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय अंदूरकर, हलगी कलाकार बाबुराव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी गावातून खंडोबा मंदिरापर्यंत हलगीच्या कडकडाटात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. प्रास्ताविक पत्रकार दयानंद काळुंके यांनी केले. या वेळी आ. ज्ञानराज चौगुले यांनी हलगी कलाकारांच्या मागण्या शासन दरबारी पोचविणार असल्याचे सांगितले. या वेळी ४० हुन वेगवेगळ्या गावातील २०० हलगी कलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते, सन्मान पत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी हलगी उत्सव पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार व प्रा संतोष पवार यांनी केले तर आभार पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांनी मानले.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
18 Dec 2022

# हलगी कलाकारांचा सन्मान होणे अभिनंदनीय बाब : माजी मंत्री चव्हाण

**अणदूर** : हलगी ही कला आहे, हलगीमुळे स्फुरण चढते, एक जोश येतो परंतु हलगी कलाकार हा कायम वंचित राहिला, त्यासाठी शासन दरबारी आवाज उठवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करू, हलगी कलाकारांनी व्यसनमुक्त व्हावे, मुलाबाळांना शिक्षण द्याव, आयोजकांनी आयोजित केलेल्या या आगळ्यावेगळ्या हलगी महोत्सवात या कलाकारांचा सन्मान केला ही अभिनंदनिय गोष्ट आहे, असे उद्गार माजीमंत्री मधुकरराव चव्हाण यांनी काढले.



अणदूर येथे जवाहर म हाविद्यालय, तुकाराम सामाजिक संस्था व जयमल्हार पत्रकार संघाच्या वतीने शनिवारी दि. १७ डिसेंबर रोजी हलगी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजीमंत्री चव्हाण अध्यक्ष पदावरून बोलत होते. यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले, पोलीस प्राधिकरण सदस्य उमाकांत मिटकर, अणदूरचे सरपंच रामचंद्र आलूरे, जव-ाहर कॉलेज चे उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, संत तुकाराम सामाजिक संस्थेचे विलास काळुंके, जयमल्हार पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय अणदूरकर, हलगी कलाकार बाबुराव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी गावातून खंडोबा मंदिरापर्यंत हलगीच्या कडकडाटात भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

प्रास्ताविकात पत्रकार दयानंद काळुंके म्हणाले की, हलगी कलाकारांच्या फार मोठ्या समस्या असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हा हलगी महोत्सव आहे. या कलेला अभिजात कलेचा दर्जा मिळावा, तसेच मैदानी खेळाचा दर्जा मिळावा, हलगी कलाकार मानधन मिळावे, शासकीय योजना, मोफत प्रवास आदी मागण्या शासनाने मान्य कराव्यात, अशी मागणी केली. यावेळी आ. ज्ञानराज चौगुले यांनी हलगी कलाकारांच्या मागण्या शासन दरबारी पोचविणार असल्याचे सांगितले. यावेळी रामचंद्र आलूरे, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ मल्लिनाथ लंगडे, उमाकांत मिटकर आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी ४० हुन वेगवेगळ्या गावातील २०० हलगी कलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते, सन्मानपत्र, पुष्प-गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. हलगी उत्सव पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.विविध गावातील हलगी पथकांनी दयानंद काळुंके यांचा सन्मान केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ मल्लिनाथ बिराजदार व प्रा संतोष पवार यांनी केले. आभार पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. अंकुश कदम, डॉ. अनिता मुदकण्णा, बाबई चव्हाण, प्रबोध कांबळे, अनिता काळुंके, दशरथ गायकवाड, काशीनाथ शेटे, शिवाजी कांबळे, आर येस. गायकवाड, दयानंद म ुडके, सचिन ढेपे, अझर शेख, जव-ाहर कॉलेज स्टाफ, पत्रकार, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन तोग्गी, संजीव आलूरे, चंद्रकांत हगलगुंडे, बालाजी राजपूत, म्ह-ाळू गळाकाटे, बसवराज पाटील, उमेश गायकवाड, सिकंदर शेख, राजू गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

दर्शन करून आले होते. शुक्रवारी (२३ डिसेंबर) सायंकाळी साडेपाच वाजता त्यांना भूक लागल्याने त्यांनी

दारूच्या नशेत गळफास घेतला. या प्रकरणी खुलताबाद पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

महापालिकेच्या अतिक्रमणविरोध
विटांनी बांधलेली घरे आणि २०

# अणदूरमध्ये रंगला हलगी महोत्सव

**म. टा. प्रतिनिधी,** औरंगाबाद



**अणदूर (जि. उस्मानाबाद) येथे आयोजित हलगी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

हलगी हा शब्द कानावर पडला तरी आपले पाय आपोआप थिरकू लागतात. या परंपरेला उजाळा देण्यासाठी अणदूर (ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद) येथे हलगी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जवाहर महाविद्यालय, तुकाराम सामाजिक संस्था व जय मल्हार पत्रकार संघ यांच्यावतीने हा महोत्सव आयोजित करण्यात आला. परिसरातील ४०हून अधिक गावांतील २०० हलगी कलाकार महोत्सवात सहभागी झाले होते. प्रारंभी श्री खंडोबा मंदिरापर्यंत हलगीच्या कडकडाटात मिरवणूक काढण्यात आली. हलगी कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली. 'हलगी ही कला आहे, हलगीमुळे स्फुरण चढते, एक जोश येतो; परंतु हलगी कलाकार हा कायम वंचित राहिला, त्यासाठी सरकार दरबारी आवाज उठवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करू,' असे आश्वासन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी कार्यक्रमप्रसंगी दिले. आमदार ज्ञानराज चौगुले, पोलिस प्राधिकरण सदस्य उमाकांत मिटकर, अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे, जवाहर कॉलेज चे उप प्राचार्य मल्लिनाथ लंगडे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, संत तुकाराम सामाजिक संस्थेचे विलास काळुंके, जयमल्हार पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय अणदूरकर, हलगी कलाकार बाबुराव गायकवाड उपस्थित होते. दयानंद काळुंके यांनी प्रास्ताविक केले.

हलगी कलाकरांच्या मागण्या सरकार दरबारी पोचवू असे आश्वासन आमदार चौगुले यांनी दिले. आलुरे, डॉ. कुंभार, डॉ. लंगडे, मिटकर आदींनी विचार मांडले. प्रा. मल्लिनाथ बिराजदार, प्रा. संतोष पवार यांनी सूत्रसंचालन केले. शिवशंकर तिरगुळे आभार मानले. कार्यक्रमास प्रा. अंकुश कदम, डॉ अनिता मुदकण्णा, बाबई चव्हाण, प्रबोध कांबळे, अनिता काळुंके, दशरथ गायकवाड, काशीनाथ शेटे, शिवाजी कांबळे, आर. एस. गायकवाड, दयानंद मुडके, सचिन ढेपे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सचिन तोग्गी, संजीव आलुरे, चंद्रकांत हगलगुंडे, बालाजी राजपूत, म्हाळप्पा गळाकाटे, बसवराज पाटील, उमेश गायकवाड, सिकंदर शेख, राजू गायकवाड आदींनी पुढाकार घेतला.